**<u>नि.दि.दा.क्र.१७३/२०१६</u>**
नि.क्र.२८९ लगत
दि.२७.११.२०२५

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा शपथेवर जबाबः–**

**नांव :– राहुल नामदेव कापरे.**

८. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

sd/–

**(एस.ए.विराणी)**

दि. २७.११.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एन. येळे यांच्यातर्फेः–**

**९.** मी वादीला त्याच्या लहानपणापासून ओळखतो. आम्ही एकाच गावात शेजारी राहत होतो. मी वादीचे दुकान पाहिलेले आहे आणि त्याच्या दुकानाची शेजारी माझी मिळकत आहे. मी वादीच्या नावे सन २०१६ ला एक संमतीपत्र करुन दिले होते. आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ३/२० वरील कागद हा दि. २७.०५.२०१६ रोजीचे मी वादी विशाल मांडोत याच्या नावे करुन दिलेले संमतीपत्राची अस्सल प्रत आहे. सदरचे संमतीपत्र तयार केल्यावर ॲड. मानसिंग शितोळे यांच्याकडे नोटरी करण्यात आली होती. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.२९१</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एस. काळे यांच्यातर्फेः–**

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या दुकानात माझे नेहमी जाणे येणे असते. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी प्रतिवादी या दोघांना ओळखत असल्यामुळे मला प्रस्तुत केसची संपूर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कामानिमित्त बारामती, इंदापूर, पुणे, केडगाव येथे नेहमी जात असतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या शेजारी असणारी माझी मिळकत मी २०२१ साली उज्वला जितेंद्र फुले यांना विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेला दि. ०१.०६.२०१९

रोजीचा दस्त हा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. साक्षीदाराला सदरचा दस्त उलटतपासात रेफर केल्यामुळे व त्यास मान्य केल्यामुळे त्यास **<u>नि. २९४</u>** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, आता माझा त्या मिळकतीशी कोणताही संबंध राहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बारामती येथील कोर्टात माझ्याविरुध्द दावा प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी बाळकृष्ण पंढरीनाथ शेळके, लालासाहेब पंढरीनाथ शेळके, गोपीनाथ पंढरीनाथ शेळके, यमुनाबाई बाळासाहेब थोरात, उषा कैलासराव वाघचौरे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वादीने प्रतिवादींकडून दि.०८.०९.२०१० रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने घेतली होती. मी ते लिव्ह ॲण्ड लायसन्स करार कधीही पाहिलेले नाही. वादीने अन्न व आवश्यक वस्तू विभागाकडून परवानगीकरिता तो करारनामा हजर केला होता याची मला माहिती नाही. मी अन्न व आवश्यक वस्तू विभागासोबत वादीचे झालेले पत्रव्यवहाराबाबत माझे त्याच्याशी बोलणे झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नि. २९१ वरील संमतीपत्र करुन देण्यापूर्वीदेखील वादीच्या दुकानात वीज पुरवठा चालू होता. वादीच्या दुकानातील वीज मीटर कुंतीलाल मांडोत यांच्या नावे होते अगर कसे याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४.१२.२००० ते दि.०९.०६.२०११ पर्यंत वादी त्या दुकानात धान्याचा व्यवसाय करत होते हे सांगण्याकरिता माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मी जतनबाई कुंतीलाल मांडोत यांना चांगले ओळखतो. मी जतनबाई यांच्या पूर्ण कुटुंबियांना ओळखतो.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.०६.२०११ पर्यंत वादी त्याच्या आईवडीलांसोबत एका घरात राहत होता. साक्षीदार म्हणतो, स्वतंत्र राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. २ मधील मजकूराची माहिती मला वादीकडून समजली होती. साक्षीदार म्हणतो, एकाच गावातील राहणारे असल्यामुळे मला त्यांच्यामधील व्यवहाराची माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, दि. १४.१२.२००० रोजीच्या दावा मिळकतीचे ताबा साठेखताबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. वादीचे अन्न व औषध विभागाशी वाद चालू असल्याबाबत माझ्या माहितीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी त्याच्या जन्मापासून कुंतीलाल मांडोत यांच्यासोबत दावा मिळकतीत राहत होता. मी विशालला त्याच्या जन्मापासून स्वामी समर्थ रोडला राहत असल्याचे पाहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, विशाल स्वामी समर्थ रोडवर राहतो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मदत करण्याकरीता मी त्याच्या बाजूने साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० साठी पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ११ ते १३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. आर. बोडखे</u>**

..(      )..

**<u>यांच्यातर्फे पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

sd/-
**(एस. ए. विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,दौंड,
जि. पुणे.

दिनांकः- २७.११.२०२५.